**प्रेस नोट दिनांक १६/०७/२०१९**

**चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन**

**इंदिरा गांधी शाळेत सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेचे उद्घाटन**

शाळेत विद्यार्थ्यांची तसेच इमारतीची सुरक्षितता महत्त्वाची असते, परंतु त्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. शाळेची मोठी प्रवेशद्वारे, कधीकधी एकापेक्षा जास्त प्रवेशद्वारे, क्रीडांगण, काही वर्दळीची ठिकाणे इथे सीसीटीव्ही यंत्रणा आवश्यक असते. चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर जाधव यांनी शाळेचे मुख्याध्यापक व स्टाफ ला या यंत्रणेचे महत्त्व पटवून दिल्याने शाळेच्या आवारात गेटजवळ कॅमेरे बसवण्यात आले. शाळा महानगरपालिकेची असल्याने महानगरपालिकेकडून सहकार्य मिळाले. या सीसीटीव्ही फूटेजचे डीव्हीआर मशीन व स्क्रीनचे उद्घाटन दि. १२ जुलै रोजी जाधव यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात स्थानिक नगरसेविका श्रीमती अर्चना मुसळे, श्री. मधुकर मुसळे तसेच इंदिरा गांधी स्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग उपस्थित होते.